# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २४/०८/२०१८

## मा. महासभा

मा. महासभा सुचना क्र. ०४

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ------------------------------------
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. महासभा मंगळवार दि. ०४/०९/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०४ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

## मा. महासभा दि. ०४/०९/२०१८ सभा सुचना क्र. ०४

### विषयपत्रिका

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| -- | प्रश्नोत्तरे - |
| -- | मागील सभांचे इतिवृत्तांत - निरंक |
| -- | सर्व निवडणूका - |
| ५४ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम २०(३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या आठ (८) सदस्यांच्या जागी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम २०(५) अन्वये नविन आठ (८) सदस्यांची नेमणूक करणे. तसेच स्थायी समितीच्या सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागी प्रकरण २ कलम २३ अन्वये सदस्यांची नेमणूक करणे. |
| ५५ | महिला व बालकल्याण समितीवर सदस्यांची नेमणूक करणेबाबत. |
| ५६ | महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ चे कलम ३(१) अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीवर सदस्यांची नेमणूक करणेबाबत. |
| -- | सर्व नियुक्त्या - निरंक |
| -- | मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| -- | विनंती अर्ज - निरंक |
| -- | स्थायी परिवहन व विशेष समित्यांचे ठराव - निरंक |
| ५७ | मिरारोड (पूर्व) रेल्वे स्टेशन समोरील चौकात विकसित करण्यात येणारे वाहतुक बेट / हुतात्मा चौक बांधून त्यांचे शहिद मेजर कौस्तुभ प्रकाश राणे असे नामकरण करणे तसेच मिरारोड आरक्षण क्र. १८७ उद्यानाचे शहिद मेजर कौस्तुभ प्रकाश राणे असे नामकरण करणेबाबत. |
| ५८ | वैद्यकिय विभागाकरीता आवश्यक उपकरणे, फर्निचर, औषधे, सर्जिकल मटेरीयल व लॅब मटेरीयल खरेदी करणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| ५९ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मंजूर केलेली जैसलपार्क घोडबंदर रस्ता व भाईंदर उत्तन रस्ता यामधील टप्पा-२ कामांची अंमलबजावणी मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे सोपविणेबाबत. |
| ६० | डॉ. पंजाबराव देखमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेअंतर्गत नोंदणीकृत संस्थांना वसतिगृह चालविण्यासाठी जागा भाड्याने देणेबाबत. |
| ६१ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुविधांच्या विकासासाठी विशेष अनुदान या योजनेअंतर्गत समितीने केलेल्या कामांसाठी महानगरपालिकेच्या ५०% हीश्याची रक्कम उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेबाबत. |
| ६२ | महापालिकेची भोगवटा दाखला (ओ.सी.) देणेबाबत अभय योजना लागु करणे. |
| ६३ | आरक्षित जागा अदलाबदल करणेबाबत धोरण ठरविणे. |
| ६४ | वसई-विरार व मिरा भाईंदर पुढे मुंबईस जोडण्यासाठी रेल्वेच्या पश्चिम बाजूस बृहंमुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील दहिसर लिंक रस्त्यास जोडणारा ४५ मिटर रुंद रस्ता विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये दर्शविणेबाबत. |
| ६५ | उत्तन रोडवरील कुंभार्डा येथील विकास आराखड्यामध्ये रस्त्याच्या डिमार्केशनमध्ये बदल करणेबाबत. |
| ६६ | बी.एस.यु.पी. प्रकल्पातंर्गत जनता नगर येथील इमारत क्र. ०१ येथील गृहनिर्माण संस्थेस नाव देणेबाबत. |
| ६७ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एल.ई.डी. दिवे बसविणेबाबत. |
| ६८ | जेसलपार्क चौपाटी देखभाल व दुरुस्ती करणेबाबत. |
| ६९ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ओल्या कचऱ्यावर विकेंद्रीकरण पध्दतीने उपलब्ध असलेल्या तंत्रज्ञानानुसार विल्हेवाट लावण्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| ७० | अग्निशमन विभागाच्या बडतर्फ केलेल्या कर्मचाऱ्यांना कामावर रुजू करुन घेणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| -- | <u>शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे -</u> |

(सही)

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- २४ ऑगस्ट, २०१८

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**बांधकाम विभाग**

**मा. महासभा दि.08/08/2018**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रमांक ( ५८ )** :- मिरारोड (पुर्व) रेल्वे स्टेशन समोरील चौकात विकसित करण्यात येणारे वाहतूक बेट / हुतात्मा चौक बांधून त्याचे शहिद मेजर कौस्तुभ प्रकाश राणे असे नामकरण करणे तसेच मिरारोड आरक्षण क्र.187 उद्यानाचे शहिद मेजर कौस्तुभ प्रकाश राणे असे नामकरण करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत मिरारोड (पुर्व) रेल्वे स्टेशनचे सुशोभिकरण काम पुर्ण करुन चौक तयार करण्यात आलेला आहे. मिरारोड येथील रहिवाशी मेजर कौस्तुभ प्रकाश राणे दि. 07 ऑगस्ट 2018 रोजी देशासाठी शहिद झाले असून सदर चौकात हुतात्मा चौकाचे बांधकाम करुन त्यास "शहिद मेजर कौस्तुभ प्रकाश राणे" यांचे नाव देण्याबाबत तसेच मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र.187 उद्यानाचे 'शहिद मेजर कौस्तुभ प्रकाश राणे' याचे नाव देण्याबाबत मा. महापौर यांनी कळविलेले आहे. सदर प्रस्तावित चौकात वाहतूक बेट बांधण्यासाठी मा.श्री. नरेंद्र मेहता, विधानसभा सदस्य यांनी रु.25.00 लक्ष आमदार निधी उपलब्ध करुन दिलेला असून मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दि.20/02/2018 रोजी सदर कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

वरील प्रस्तावानूसार नामकरणाबाबत निर्णय होणेस शिफारस आहे.

16/8/18

**(बालाजी खतगावकर)**
**आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.०८/०९/२०१८

### ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. :- ५८**

**विषय : वैद्यकीय विभागाकरिता आवश्यक उपकरणे, फर्निचर, औषधे, सर्जिकल मटेरिअल व लॅब मटेरिअल खरेदी करणेकरिता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाअंतर्गत एकुण १० आरोग्य केंद्र / उपकेंद्र, भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय व भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय कार्यरत आहे. याकरिता आवश्यक औषधे, लॅब मटेरिअल, सर्जिकल मटेरिअल करीता नव्याने वार्षिक निविदा मागविणे आवश्यक आहे. तसेच भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय शासनाकडे वर्ग करणेची प्रक्रीया सुरु आहे त्यातील उर्वरीत मॉडयुलर ओ.टी., आय.सी.यु., आय.सी.सी.यु. सुरु करणेकरीता उपकरणे व फर्निचर खरेदी करणेकरीता निविदा मागविणे आवश्यक आहे. याकरीता आवश्यक उपकरणे, फर्निचर, औषधे, सर्जिकल मटेरिअल व लॅब मटेरिअल यांची यादी सोबत जोडली आहे.

सन २०१८-१९ या वर्षासाठी औषधे खरेदीकरिता रु. ५०,००,०००/- रुग्णालये लॅब मटेरीअल खरेदी / साहीत्य देखभाल दुरुस्ती कामे करिता रु. १,००,००,०००/- श्वानदंश/ सर्पदंश/ काविळ लस खेरदी करिता रु. २५,००,०००/-, रुग्णालये सर्जिकल व फर्निचर/ उपकरणे खरेदी करणे करिता रु. ४,००,००,०००/-अंदाजित खर्च अपेक्षीत आहे.

तरी वैद्यकीय विभागाकरिता आवश्यक उपकरणे, फर्निचर, औषधे, सर्जिकल मटेरिअल व लॅब मटेरिअल इत्यादी निविदा मागवुन खरेदी करणेकरिता मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेकरिता सादर.

(श्री. बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

**मा. महासभा दि. 04/09 /2018**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रमांक ( 48 )** :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मंजुर केलेली जैसलपार्क घोडबंदर रस्ता व भाईंदर उत्तन रस्ता या मधील टप्पा-2 कामांची अंमलबजावणी मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे सोपविणेबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत "विस्तारीत पायभुत सुविधा प्रकल्पांतर्गत" खालील रस्त्यांची कामे मंजुर करण्यात आलेली आहेत.

1) भाईंदर (पश्चिम) सुभाषचंद्र बोस मैदान ते उत्तन गांव रस्त्याचे रुंदीकरण व कॉक्रिटीकरण करणे.

2) भाईंदर (पुर्व) जैसलपार्क ते घोडबंदर रस्ता तयार करणे.

3) भाईंदर (पश्चिम) सुभाषचंद्र बोस मैदान ते दहिसर (पश्चिम) जोडणारा लिंक रस्ता तयार करणे.

उपरोक्त रस्त्याच्या कामापैकी अ.क्र.1 व 2 मधील कामातील टप्पा-1 च्या कामाच्या निविदा प्राधिकरणामार्फत मंजुर केल्या आहेत, त्यापैकी घोडबंदर वेस्टर्न हॉटेल ते घोडबंदरकडे जाणाऱ्या 60 मीटर रुंदीच्या रस्त्याचे काम सुरु देखील करण्यात आलेले आहे. उपरोक्त नमुद अ.क्र.1 व 2 मधील प्राधिकरणाने टप्पा-2 मध्ये खालील कामे केलेली आहेत.

1) राई गांव ते उत्तन रस्ता रुंदीकरण व कॉक्रिटीकरण करणे.

2) घोडबंदर गांव पाठीमागुन जैसलपार्क कडे येणारा 30 मीटर व 18 मीटर रुंदीचा रस्ता कॉक्रिटीकरणासह तयार करणे.

उपरोक्त कामांना सी.आर.झेड प्राधिकरणाच्या दृष्टीने मान्यता प्राप्त झालेली असुन वन विभागाची परवानगी घेण्याची प्रक्रीया सुरु आहे. तद्नंतर सदर रस्त्याखालील जागा विकास हक्क प्रमाणपत्राद्वारे ताब्यात घेता येणार आहे. मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडे दि.03/08/2018 रोजी झालेल्या बैठकीत सदर कामे करण्यासाठी प्राधिकरणामार्फत मिरा-भाईंदर महानगरपालिकेस निधी उपलब्ध करुन देऊन सदर कामाची पुढील सर्व अंमलबजावणी मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत करण्यासंबंधी चर्चा झाली. सदर कामांची

अंमलबजावणी मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत केल्यास सदर कामे ही जलदगतीने होतील. सदर कामाची अंमलबजावणी करण्यासाठी ठराव करुन प्राधिकरणास पाठवावा लागेल. तरी सदर प्रस्तावाबाबत विचार विनिमय होऊन निर्णय होणेस शिफारस आहे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
6/8/18
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-4/2018-19/DK/MG-2

गोषवारा प्राप्त दि. 6/8/2018 वेळ 10.34
मा. ~~स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. 36
लिपीक 6/8/18
नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.०४/०९/२०१८

## बांधकाम विभाग

## // गोषवारा //

**प्रकरण क्र.** ( ६० ) :- डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेतंर्गत नोंदणीकृत संस्थाना वस्तीगृह चालविण्यासाठी जागा भाडयाने देणेबाबत...

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्र मुंबई महानगर क्षेत्रात मोडत असून शहर मुंबई महानगरपालिकेलगत वसलेले आहे. त्यामुळे मुंबई मध्ये कामधंद्या निमित येणारे नागरीक रहिवांसासाठी मोठया प्रमाणावर मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात येतात. त्यामुळे मिरा-भाईंदर शहरांचे झपाट्याने नागरीकरण झालेले असून शहराची लोकसंख्या प्रचंड वेगाने वाढलेली आहे.

डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेतंर्गत नोंदणीकृत संस्थाना वस्तीगृह चालविण्यासाठी शासकीय व इतर इमारती भाडयाने देणेबाबत, उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण -2018/प.क्र.249/18/तांशि-4 दि.13/07/2018 अन्वये नोंदणीकृत संस्थानी वस्तीगृह चालविण्याचा निर्णय शासनाने केली आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडून रेंटल हाऊसिंग स्कीम या योजनेतंर्गत तीस वर्षाच्या भाडे तत्वावर एस.के.डी.इमारतीमधील 505 सदनिका मिरा-भाईंदर महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेल्या आहेत. सदर सदनिकेला मासिक भाडे रु.3000/- प्रति सदनिका असे मा. महासभा ठराव क्र.92 दि.01/03/2014 रोजी निश्चीत केलेले आहे. सदर सदनिका ह्या धोकादायक इमारती, रस्ता रुंदीकरण, बी.एस.यु.पी.प्रकल्पातंर्गत बाधीत लाभार्थ्यांना तात्पुरत्या स्वरुपात संक्रमण शिबीर म्हणुन वापर सुरु आहे. सदर एस.के.डी. इमारतीमधील 505 सदनिका पैकी 15 सदनिका मुले व मुलींसाठी वस्तीगृह सुरु करण्यासाठी शासनाने डॉ.पंजाबराव देशमुख वस्तीगृह निर्वाह भत्ता योजनेतंर्गत नोंदणीकृत संस्थाना वस्तीगृह चालविण्यासाठी भाडयाने देण्याकरीता मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांनी समक्ष कळविलेले आहे. वरील वस्तुस्थीती पाहता सदर "भाडे तत्वावरील घरे" मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण रेंटल हाऊसिंग स्कीम या योजनेतंर्गत भाडयाने महानगरपालिकेस दिल्याने सदर योजनेसाठी देण्यासाठी मा. महानगर, आयुक्त यांच्याकडून प्रस्तावीत सदनिकाची मंजुरी घेण्यासाठी महानगरपालिकेमार्फत पत्र व्यवहार केलेला आहे.

डॉ.पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजनेतंर्गत नोदंणीकृत संस्थांना वस्तीगृह चालविण्यासाठी भाडयाने इमारत देण्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेण्यास शिफारस आहे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

18/8/18

PC-09/VP/2018-19 /DK/MG -02

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

**मा. महासभा दि. ०४/०८ /2018**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रमांक ( ६९ )** :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुविधांच्या विकासासाठी विशेष अनुदान या योजनेअंतर्गत समितीने केलेल्या कामांसाठी महानगरपालिकेच्या 50% हिश्श्याची रक्कम उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खालील कामांना विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखालील समितीने "महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुविधांच्या विकासासाठी विशेष अनुदान" या योजनेअंतर्गत दि.12/02/2016 रोजीच्या बैठकीत प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १) | भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट रस्त्यावर न्यु गोल्डन नेस्ट येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| २) | भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट रस्त्यावर इंद्रलोक फेस-२ गेट जवळ बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ३) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील बालाजी हॉस्पिटल जवळ बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ४) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील नक्षत्र टॉवर जवळ बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ५) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील तुंगा हॉस्पिटल जवळ बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ६) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील चैतन्य हॉस्पिटल (टाटा डोकोमो) जवळ बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ७) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील शिवार गार्डन येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ८) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील बेवर्ली पार्क (मॅकडॉनल्ड नाका) जवळ बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ९) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील एस.के.स्टोन सिग्नल येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| १०) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील सुंदर नगर येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ११) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील सिल्वर पार्क येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| १२) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील हटकेश (मारुती सुझुकी शोरुम) येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| १३) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील आशिष पटेल बंगल्याशेजारी येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| १४) | मिरारोड (पूर्व) कनकिया रस्त्यावरील कनकिया पोलिस चौकी जवळ बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| १५) | भाईंदर (पूर्व) गौरव गार्डन, शुभम बार समोर बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| १६) | हटकेश येथील १५ नं. बस स्टॉप येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| १७) | हटकेश येथील २२ नं. शेवटचा बस स्टॉप (शांतीनगरी) बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| | एकूण | रु.८५,००,०००/- |

वरील कामांचा निधी उपलब्ध करुन देणेसाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात येत आहे. सदर कामांसाठी 50% निधी हा महानगरपालिकेस खर्च करावयाचा आहे. सदर 50% हिश्श्याची रक्कम महानगरपालिका करणार असल्याबाबत ठराव घेऊन अनुदान उपलब्धतेसाठी प्रस्ताव सादर करावयाचा आहे. तरी सदर प्रस्तावास मान्यता देण्यास शिफारस आहे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

21/8/18

PC-4/2018-19/DK/MG-3

गोषवारा प्राप्त दि.29/08/2018 वेळ 2:30 pm
मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. 80
लिपिक 29/08/2018
नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.** ०४/०९/२०१८

**// टिप्पणी //**

**प्रकरण क्र.** (६२) **- महापालिकेची भोगवटा दाखला (ओ.सी.) देणेबाबत अभय योजना लागु करणे.**

विषयांकित प्रकरणी नगररचना विभागाचा अहवाल खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.

मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम क्र. 6(7)(8) प्रमाणे शहरामधील इमारतीसाठी भोगवटा दाखला देण्याची कार्यवाही करणेत येत असून मिरा भाईंदर शहरामधील भोगवटा न घेता वापर सुरु असलेल्या व 5 वर्षापुर्वी नोंदणी झालेल्या गृहनिर्माण संस्थेसाठी भोगवटा दाखला देणेबाबत विशेष सवलत मोहिम राबविणेसाठी दि.23/03/2015 रोजीच्या मा. महासभेने ठराव क्र. 72 अन्वये अटीशर्तींच्या आधारे दि.31/03/2016 पर्यंत मान्यता दिलेली आहे.

सदर मोहिमे अंतर्गत भोगवटा दाखला मिळणेकामी दाखल झालेल्या अर्जांपैकी बहुतांश प्रकरणामध्ये आवश्यक कागदपत्राची पुर्तता नसल्यामुळे प्राप्त अर्ज नामंजूर करणेत आलेली असल्यामुळे व सदर योजनेचा लाभ अधिकाधिक लोकांना होणेच्या दृष्टीकोनातून सदर मोहिमेसाठी दि.28/06/2016 (दि.07/05/2016 रोजीची तहकूब मा. महासभा) रोजी मा. महासभेने ठराव क्र. 22 अन्वये दि.31/03/2018 रोजी पर्यंत मुदतवाढ मंजूर केलेली आहे.

सदर स्थितीत सदर योजनेची मुदत संपुष्टात आलेली आहे.

**(बालाजी खतगांवकर)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

20/8/18

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.    /09/2018

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. (६३) -** **आरक्षित जागा आदलाबदल करणेबाबत धोरण ठरविणे.**

मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार महापालिका क्षेत्रात दाखल होणा-या विकास प्रस्तावांतर्गत 2 हेक्टर वरील रहिवास विभागातील क्षेत्राकरिता मंजूर नियमावली नुसार 5% सुविधा भूखंड महापालिकेस देणे आवश्यक आहे. तसेच विकास प्रस्तावांतर्गत जमिनीचे औद्योगिक ते रहिवास अथवा वाणिज्य वापरामध्ये रुपांतरण करणांना मंजूर नियमावली मधील तरतूदीनुसार महापालिकेस सुविधा भूखंड देणे आवश्यक आहे. महापालिकेकडे प्राप्त होणा-या सुविधा भूखंडावर परिसरातील नागरी सुविधांची आवश्यकता विचारात घेऊन वापर निश्चित करण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांना आहेत.

तसेच मंजूर विकास योजनेतील आरक्षणाखालील भूखंड जे विकास हक्क प्रमाणपत्रान्वये / अतिरिक्त चटईक्षेत्रान्वये महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले आहे व अद्यापपर्यंत महानगरपालिके मार्फत विकसीत करण्यात आलेले नाहीत. असे भूखंड मोकळ्या स्वरुपात राहिल्यास त्यावर भविष्यात अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव महापालिकेच्या ताब्यातील सदर आरक्षित भूखंडाचे आरक्षणाच्या वापरानुसार विकसन होणे आवश्यक आहे.

विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार व शासनाने मंजूर केलेल्या टि.डी.आर. बाबत अधिसूचनेमध्ये भूखंडधारक / विकासक यांनी नियोजन प्राधिकरणास हस्तांतरीत केलेल्या आरक्षित भूखंड / सुविधा भूखंडावर सदर भूखंडधारक / विकासक यांचेकडून कन्स्ट्रक्शन टि.डी.आर. च्या मोबदल्यात बांधिव सुविधा विकसीत करुन घेणेबाबत तरतूद असून, त्या तरतूदीनुसार महानगरपालिकेमार्फत काही प्रस्ताव विकसीत करुन घेण्यात आलेले आहे. तरी भूखंडधारक / विकासक यांनी हस्तांतरीत केलेले आरक्षित भूखंड / सुविधा भूखंड मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अटी / शर्तीनुसार भूखंडधारक / विकासक यांना पुर्नखरेदी करुन विकसीत करुन देण्यासाठी इच्छुक असणा-या भूखंडधारक / विकासक यांना सदर जागा वितरीत करणेसाठी धोरण निश्चित करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 नुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या मिळकती बाजारभावानुसार वितरीत करण्याती तरतूद आहे.

सदर प्रकरणी विकासक यांनी हस्तांतरीत केलेला / करण्यात येणा-या सुविधा भूखंड **तसेच महापालिकेच्या ताब्यातील आरक्षित भूखंड परत मिळणेकरिता भूखंडधारक / विकासक यांनी मागणी केल्यास, अटीशर्तीवर विकसनास उपलब्ध करुन देणेबाबत ठाणे महानगरपालिकेने धोरण** निश्चित केलेले आहे. सदर धोरणाप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकचे धोरणात्मक निर्णय होवून खालीलप्रमाणेच्या अटीशर्ती नमुद करणे योग्य वाटते.

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 नुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या मिळकती बाजारभावानुसार वितरीत करण्याची तरतूद असल्याने, भूखंडधारक / विकासक यांनी महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेला मंजूर विकास योजनेतील आरक्षित भूखंड विकासकास विकासासाठी द्यावयाच्या झाल्यास भूखंडधारक / विकासक यांना महाराष्ट्र शासनाच्या रेडी रेकनर मधील जमिनीच्या दराच्या 125% प्रमाणे आकारणी करुन महापालिकेच्या अटी / शर्ती नुसार देणेबाबत विचार करता येऊ शकेल.

2) विकासकांनी महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेल्या सुविधा भूखंडापैकी 300 चौ.मी. क्षेत्राच्या मर्यादित क्षेत्राचा भूखंड विकासकांनी मागणी केल्यास महाराष्ट्र शासनाच्या रेडी रेकनर मधील जमिनीच्या दराच्या 125% प्रमाणे आकारणी करुन देता येऊ शकेल.

3) विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार सुविधा भूखंडातील वापर निश्चित करण्याचे **अधिकार मा. आयुक्त सो. यांना असल्याने 300 चौ.मी. क्षेत्रापेक्षा जास्तीच्या भूखंडासाठी विकासकांनी मागणी केल्यास वरीलप्रमाणे जमिनीच्या दराच्या 125% प्रमाणेच्या रक्कमेची आकारणी करुन भूखंड** विकासकास परत देणेसह सदर भूखंडावर मा. आयुक्त सो. यांनी निश्चित केलेल्या वापरानुसार विकासक यांनी सुविधा भूखंडाच्या 40% क्षेत्राचे बांधीव क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरीत करणे आवश्यक असेल व सदर बांधीव क्षेत्रासाठी महानगरपालिका विकासकास मंजूर तरतूदीप्रमाणे विकास हक्क प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करेल. तसेच विकासकास सुविधा भूखंडाच्या उर्वरीत 60% क्षेत्रावर संपूर्ण सुविधा भूखंडाच्या क्षेत्राऐवढे चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय होईल.

4) टि.डी.आर. / डी.आर. चे मोबदल्यात महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली मंजूर विकास योजनेतील आरक्षणाखालील जागा आरक्षणाच्या वापरानुसार विकसीत करणे भूखंडधारक / विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

5) मंजूर विकास योजनेमधील आरक्षणाने बाधीत क्षेत्र विकासकांनी 125% प्रमाणेच्या रक्कमेचा भरणा करुन भूखंड प्राप्त करुन घेतल्यानंतर आरक्षित भूखंडाच्या क्षेत्राच्या शासन निर्णयाप्रमाणे बांधिव क्षेत्राचे बांधकाम महानगरपालिकेकडे विनामोबदला हस्तांतरण करणे भूखंडधारक / विकासक यांचेवर बंधनकारक राहील. याबाबत शासनाने दि.02/05/2016 रोजी समावेशक आरक्षणाचे (आरक्षित) विकसनाकरिता धोरण निश्चित केले आहे. सदर धोरणाप्रमाणे संबधित आरक्षणाचा विकास करणे विकासकावर बंधनकारक राहील.

उपरोक्त प्रमाणे अटीनुसार भूखंडधारक / विकासक यांना सुविधा भूखंड / मंजूर विकास योजनेती महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या आरक्षित भूखंड परत द्यावयाचा झाल्यास महापालिकेस रेडी रेकनर मधील जमिनीच्या दराच्या 125% नुसार येणा-या सुविधा भूखंडाचे / आरक्षित भूखंडाचे क्षेत्राकरिता रक्कम प्राप्त होणार असून, आरक्षित भूखंडाच्या शासन निर्णयाप्रमाणे बांधिव क्षेत्र भूखंडधारक / विकासकाकडून प्राप्त होणार असल्याने, सदर धोरण मंजूर झाल्यास महापालिकेला निधीसह बांधकाम उपलब्ध होणार आहे.

यास्तव याबाबत धोरणात्मक निर्णय घेणेसाठी अहवाल मा. महासभेस सादर

(बालाजी खतगांवकर) 20/8/18

आयुक्त

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि. 29/08/2018 वेळ 03.30 वा.

~~प्रा. स्थायी समिती~~ / मा. महासभा गोषवार नों.

रजिस्टर अ. क्र. 82 वर्ष :- 2018-19

29/08/2018

नगररचना विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.०४/०९/2018**

**// टिप्पणी //**

**प्रकरण क्र. ६४ - वसई विरार व मिरा भाईंदर पुढे मुंबईस जोडण्यासाठी रेल्वेच्या पश्चिम बाजूस बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील दहिसर लिंक रस्त्यास जोडणारा, 45.00 मी. रुंद रस्ता विकास योजनेत म.प्र. व न. अ. 1966 चे कलम 37 अन्वये दर्शविणेबाबत.**

वसई विरार व मिरा भाईंदर पुढे मुंबईस जोडण्यासाठी रेल्वेच्या पश्चिम बाजूस बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील दहिसर लिंक रस्त्यास जोडणारा, 45.00 मी. रुंद रस्ता विकास योजनेत म.प्र. व न. अ. 1966 चे कलम 37 अन्वये दर्शविणेबाबत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने पत्र क्र.मनपा/साबा/4119/2018-19 दि.06/08/2018 रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेच्या नगररचना विभागास कळविलेले आहे. तद्अनुषंगाने उपरोक्त प्रकरणातील वस्तुनिष्ठ अहवाल खालील प्रमाणे सादर करणेत येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.14/05/1997 रोजी मंजूर झालेली असून दि.15/07/1997 पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.25/08/2000 रोजी मंजूर झालेली असून दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-1208/1346/प्र.क्र.267/08/नवि-12, दि.29/08/2009 अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) मार्फत विस्तारित पायाभूत प्रकल्पाअंतर्गत वसई भाईंदर खाडी पुलाचे काम हाती घेण्यात येणार असून त्या पुलासाठी पुरक ठरणारा-दहिसर भाईंदर जोड रस्ता (रेल्वेच्या पश्चिम बाजूस वसई विरार महानगरपालिका क्षेत्रापासून वसई खाडीवर पुल बांधून मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातून पुढे बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील दहिसर लिंक रोडला जोडणारा 45.00 मी. रुंद रस्ता) तयार करणेचे प्रस्तावित आहे.

सदर रस्त्यापैकी वसई खाडी ते सुभाषचंद्र बोस मैदान पर्यंतचा रस्ता विकास योजनेत दर्शविणेस मा. महासभा, दि.01/07/2015, ठराव क्र. 28 अन्वये मंजूरी देण्यात आलेली असून सदरचा महाराष्ट्र प्रांतिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) चा फेरबदल प्रस्ताव शासनास पत्र क्र.मिभामनपा/नर/3648/2016-17 दि.16/11/2016 अन्वये सादर करणेत आला आहे. सदरचा फेरबदल प्रस्ताव शासनाने पत्र क्र.टिपीएस-1216/3171/प्रक्र.228/17/नवि-12 दि.31/01/2018 च्या पत्रान्वये पत्रात नमुद बाबींच्या पुर्ततेसह सादर करणेस कळविले आहे.

मंजूर विकास योजनेत प्रस्तावित फेरबदला पुढील मिरारोड पश्चिमेकडे दर्शविलेला विकास योजना रस्ता काटकोनी वळणाचा असल्याने त्याऐवजी सुधारीत सरळ आखणी प्रस्तावित करण्याची सूचना सी.आर.झेड. प्राधिकरणाकडील स्टेट लेव्हल एक्सपर्ट अप्रेझल कमिटीने (SEAC-I) केली आहे. त्याप्रमाणे नव्याने सुधारीत आखणी दर्शविणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवणेस महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने कळविले आहे.

वरील स्थितीत मंजूर विकास योजनेत सुभाषचंद्र बोस मैदान ते मौजे भाईंदर, स.क्र. (625)151 पर्यंत दर्शविलेला 45.00 मी. रुंद विकास योजना रस्ता हा मौजे भाईंदर, स.क्र. (650)226 पर्यंत कायम ठेवून त्या पुढील 45.00 मी. रुंद विकास योजना रस्ता वगळून सदर विषयांकित रस्ता सोबतच्या नकाशात दर्शविलेनुसार नव्याने दर्शवावा लागणार आहे.

प्रस्तावित फेरआखणीनुसार नव्याने दर्शविलेला रस्ता मौजे भाईंदर, स.क्र. (651)24, (650)226, (640)225, (641)224, (642)197, (635)199, (637)190, (749)189, (634)188, (750)187, (636), (751)187, (631)185, (622)181, (623)182, (625)151, (617)146, (763)147, (261)24, (192)22 या जागेतून जाणार आहे. प्रस्तावित रस्त्याखालील जागा CRZ बाधीत क्षेत्रामधील आहे.

शासनाचे दि.31/01/2018 रोजीच्या पत्रातील मुद्दा क्र. "ड" नुसार वसई विरार, मिरा भाईंदर व बृहन्मुंबईस जोडणारा जोड रस्ता हा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत विकसीत करणेत येणार असल्याने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सदर रस्त्याच्या रुपरेषेच्या सुसंगतीबाबत मु.म.प्र.वि. प्राधिकरणाकडील अभिप्राय मिळणेसाठी पत्र देण्यात आलेले आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडील अभिप्राय प्राप्त झाल्याअंती रस्त्याच्या रुपरेषेत फेरबदल असल्यास त्याप्रमाणे रस्त्याची रुपरेषा निश्चित करुन फेरप्रस्ताव मा. महासभेपुढे सादर करणेत येईल.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त 24/8/18
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०४ /०९/2018

### // टिप्पणी //

**प्रकरण क्र. (६५) :- उत्तन येथील "कुंभार्डा रोड" येथील विकास आराखडयामध्ये रस्त्याच्या डिमार्केशनमध्ये बदल करणे.**

विषयांकित प्रकरणी नगररचना विभागाचा अहवाल खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.

महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत डोंगरी, तारोडी, चौक, पाली व उत्तन या महसुली गावासाठी "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण" यांनी तयार करण्यात आलेली विकास योजना (वगळलेला भाग सोडून) मा. शासनाने दि.13/05/2013 अन्वये मंजूर केलेली आहे. तसेच वगळलेल्या भागासाठी दि.03/06/2016 रोजी मंजुरी आहे.

सोबतच्या मोजणी नकाशावर हिरव्या रंगाने दर्शविण्यात आलेले **"क ते ड"** रस्ता उक्त मंजूर विकास योजनेत 12.00 मी. रुंदीचा विकास योजना रस्ता (D.P. Road) म्हणून दर्शविण्यात आलेला आहे. तसेच याच नकाशावर तपकिरी रंगाने दर्शविण्यात आलेला **"अ ते ब"** रस्ता विद्यमान रस्ता (Existing Road) म्हणून दर्शविण्यात आलेला आहे. सदर रस्त्याची पाहणी केली असता खालीलप्रमाणे वस्तूस्थिती दिसून आली.

उक्त 12.00 मी. रुंद विकास योजना रस्त्याच्या आखणीत **("क ते ड")** विद्यमान घरे व झाडे अस्तित्वात असून नियोजित रस्त्याखालील जागा उंच-सखल स्वरुपाची आहे. तसेच **"अ ते ब"** प्रमाणे दर्शविण्यात आलेला विद्यमान रस्ता कच्च्या स्वरुपाचा आहे. या रस्त्याच्या पश्चिमेकडील बाजूस विद्यमान कुंपण भिंत / भूखंड अस्तित्वात आहेत. तसेच पूर्वकडील बाजूस मिठागर (Salt Pan) खालील जागा आहे.

विकास योजना अंतर्गत रस्ता सद्स्थितीत नियोजनाच्या दृष्टीने विकसित करणे शक्य होणार नसल्यामुळे मा. महापौर यांनी सुचविण्यात आल्याप्रमाणे विद्यमान रस्त्याच्या **(अ ते ब)** मध्यापासून दोन्ही बाजूस समान 6.00 मीटर अंतरावर (एकूण 12.00 मी. रुंद) रुंदीकरण दर्शवून प्रस्तावित 12.00 मी. रुंदीचा रस्ता प्रस्तावित केलेला असून पुढे तो विकास योजने प्रमाणे कायम ठेवण्यात आलेला आहे.

प्रस्तावित 12.00 मी. रुंद रस्त्याखालील जागा प्राप्त सी.आर.झेड. वर्गीकरणाच्या नकाशानुसार भागशः सी.आर.झेड I (ii) व भागशः सी.आर.झेड III अन्वये बाधीत होत आहे.

तरी वरील प्रमाणे दर्शविण्यात आलेल्या प्रस्तावित रस्त्याच्या आखणीतील फेरबदलाबाबत मा. महासभेने निर्णय घेण्यास सादर.

**(बालाजी खतगांवकर)** २५/८/१८
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.०४/ ०८/२०१८

## बांधकाम विभाग

## // गोषवारा //

**प्रकरण क्र.** ( ६६ ) :- बी.एस.यु.पी.प्रकल्पातंर्गत जनतानगर येथील इमारत क्र.01 येथील गृहनिर्माण संस्थेस नाव देणेबाबत..

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये जनतानगर येथे बी.एस.यु.पी.प्रकल्पाचे काम सुरु असून सदर प्रकल्पाची जे-3 पॅकेजमधील इमारत क्र.01 चे काम पुर्ण झालेले आहे. सदर इमारतीमध्ये 179 सदनिका व 21 दुकाने आहेत. सदर सदनिका मध्ये लाभार्थ्यांना स्थलांतरीत करण्यात आले आहे.

सदर इमारतीतील लाभार्थ्यांना गृहनिर्माण संस्थेची नोंदणी करुन द्यावयाची असल्याने सदर गृहनिर्माण संस्थेस नाव देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेण्यास शिफारस आहे.

20/8/18

**(बालाजी खतगांवकर)**
**आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-09/VP/2018-19 /DK/MG -03

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

**मा. विशेष महासभा दि.०४/ ०९ /2018**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रमांक** (६७) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एल.ई.डी. दिवे बसविणेबाबत

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एल.ई.डी. दिवे बसविणेबाबत मा. महासभा दि.18/04/2018 ठराव क्र.03 अन्वये खाजगी संस्थामार्फत प्रस्ताव मागविण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. शासन नगरविकास विभाग निर्णय क्रमांक संकीर्ण-2017/प्र.क्र.183/नवि-20 दि.12 जानेवारी 2018 रोजीच्या शासन निर्णयानूसार नागरी स्वराज्य संस्थानी फक्त एल.ई.डी. दिवे बसविण्याच्या सुचना दिल्या असून त्याअनुशंगाने सर्व नागरी स्वराज्य संस्थानी पथदिव्यांसाठी फक्त एल.ई.डी. दिवे बसविणे बंधनकारक आहे.

सदर शासन निर्णयात राज्याच्या उर्जा धोरणास अनुसरून राज्यातील सर्व नागरी स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रातील रस्त्यावरील प्रकाश व्यवस्थेकरीता (पथदिवे) एल.ई.डी. दिव्यांचा वापर करून उर्जा संवर्धन करण्यासाठी ई.ई.एस.एल. (EESL) या केंद्रशासनाच्या सार्वजनिक उपक्रमाशी करारनामा (MOU) करण्याचा निर्णय घेतलेला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पथदीवे एल.ई.डी. करण्याबाबत शासनाच्या सुचनेनूसार ई.ई.एस.एल. या केंद्रशासनाच्या उपक्रमाकडून प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात 1978 या ग्रामपंचायत काळापासून मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर मे. बी.एस.ई.एस. लि. तदनंतर सदर कंपनी हस्तांतर झालेल्या मे. रिलायन्स एनर्जी लि. मार्फत पथदीवे बसविण्याची कामे करण्यात येत आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर त्यांना त्यांना वीज वापर व देखभाल, दुरूस्तीचे मासिक देयक अदा करण्यात येत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील स्ट्रीट लाईट पोलची मालकी ही मे. रिलायन्स एनर्जी लि. यांची असल्याने त्यांच्याकडून देखिल प्रस्ताव मागविण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत शहरात मे. रिलायन्स एनर्जी लि. यांचे 13520 व महानगरपालिकेचे स्वत:चे 2363 पथदीवे आहेत. मे. रिलायन्स एनर्जी लि. यांनी खालील प्रमाणे प्रस्ताव दिलेला आहे.

**पर्याय क्र.01** - सध्या अस्तित्वात असलेल्या AIH Scheme मधील HPSV LAMP बदलुन एल.ई.डी. दिवे करण्यासंदर्भात मुंबई महानगपालिकेच्या धर्तीवर सदर दरामध्ये वाढ करुन मंजुरी देण्यात यावी. (Without Financial Assistance)

| | ing HPSV Lamp | | | Equivalent LED Lamp | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| No. Of Street Light Poles | Wattage | Existing AIH per Lamp per Month | Monthly Payable Amount of per Month | Wattage | AIH per Lamp per month (without Financial Assistance) | Monthly Payable Amount of per Lamp per Month | Increases Amount of per Month | Total Annual Payment Amount (Rs.) |
| 7015 | 70 | 835 | 58,57,525/- | 50 | 1070 | 7506050 | 16,48,525/- | 1,97,82,300/- |
| 4970 | 150 | 910 | 45,22,700/- | 105 | 1185 | 5889450 | 13,66,750/- | 1,64,01,000/- |
| 1234 | 250 | 860 | 10,61,240/- | 170 | 1175 | 1449950 | 3,88,710/- | 46,64,520/- |
| | | | | | | | Rs. | **4,08,47,820/-** |

तसेच जर सदर कामी महानगरपालिकमार्फत एल.ई.डी. दिवे बदलण्याकामी रु 10.50 कोटी इतकी रक्कम देणार असल्यास मे. रिलायन्स एनर्जी यांना प्रथम 10% रक्कम आगाऊ स्वरुपात व दिवे बदल्यानंतर उर्वरीत 90% रक्कम दणे बंधनकारक राहील.

**पर्याय क्र.02** - मिरा-भाईदर महानगरपालिकेमार्फत सध्या अस्तित्वात असलेले HPSV LAMP बदलुन त्या एवजी एल.ई.डी. दिवे बसविणे कामी पुरणत: येणारा खर्च देण्यात यावा. (With Financial Assistance)

| | Existing HPSV Lamp | | | Equivalent LED Lamp | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| No. Of Street Light Poles | Wattage | Existing AIH per Lamp per Month | Monthly Payable Amount of per Month | Wattage | AIH per Lamp per month (with Financial Assistance) | Monthly Payable Amount of per Lamp per Month | Decreases Amount of per Month | Total Annual Payment Amount (Saving) |
| 7015 | 70 | 835 | 58,57,525/- | 50 | 805 | 5647075 | 2,10,450/- | 25,25,400/- |
| 4970 | 150 | 910 | 45,22,700/- | 105 | 855 | 4249350 | 2,73,350/- | 32,80,200/- |
| 1234 | 250 | 860 | 10,61,240/- | 170 | 800 | 987200 | 74,040/- | 8,88,480/- |
| | | | | | | | Rs. | **66,94,080/-** |

सदर दिवे बदल्यानंतर अंदाजे मासिक वीज देयकामध्ये 40% बचत होईल. तथापी सदर सदर देखभाल दुरुस्ती दरामध्ये AIH अंतर्गत दर तीन वर्षांनी मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर वाढ करण्यात होत असते. परंतु वार्षिक रु.66.94 लक्ष (मासिक रु.5.57 लक्ष) रकमेची देखभाल दुरूस्ती खर्चात बचत होणार आहे.

मे. रिलायन्स एनर्जी लि. मार्फत पथदीवे विजपूरवठासाठी सरासरी मासिक रु.55.00 लक्ष एवढे वीजबील येत असून एल.ई.डी. लाईट बसविल्यानंतर त्यामध्ये 40% बचत म्हणजेच रु.22.00 लक्ष रकमेची बचत होणार आहे.

मे. रिलायन्स एनर्जी लि. यांना एल.ई.डी. दिवे बसविण्यासाठी महानगरपालिकेने पैसे दिल्यास देखभाल व दुरूस्ती खर्चास देखिल सुमारे रु.5.58 लक्ष मासिक व रु.66.94 लक्ष वार्षिक बचत होणार आहे.

त्याचप्रमाणे मे. रिलायन्स एनर्जी लि. यांना महानगरपालिकेने सुरवातीस रक्कम न दिल्यास एल.ई.डी. दिव्याचे रकमेसाठी वार्षिक 4.08 कोटी (मासिक रु.34.03 लक्ष) रक्कम द्यावी लागेल व सदर रकमेत दर तीन वर्षांनी वाढ होणार आहे.

मे. ई.ई.एस.एल. यांनी खालीलप्रमाणे प्रस्ताव दिला आहे.

मे. ई. ई. एस. एल. यांच्या मार्फत प्रक्षमत: शहरातील सर्व एकुण 13,520 दिवे बदलणे कामी Project Investment Cost रु. 8.91 कोटी इतकी असुन त्याकामी Annual Repayment to be made by mbmc to EESI(Including GST) खालील प्रमाणे आहेत.

MBMC Payment Schedule Annuity Payment

| Years | Annual Repayment Amount (Rs.) | GST @ 18% | Total Annual Repayment Amount (Rs.) |
|---|---|---|---|
| 1 | 2,45,38,012.72 | 29,25,420.62 | 2,74,63,433.34 |
| 2 | 2,47,51,838.37 | 27,56,648.15 | 2,75,08,486.52 |
| 3 | 2,49,78,493.56 | 25,59,858.83 | 2,75,38,352.39 |
| 4 | 2,52,18,748.06 | 23,30,463.32 | 2,75,49,211.38 |
| 5 | 2,54,73,417.84 | 20,63,090.87 | 2,75,36,508.70 |
| 6 | 2,57,43,367.79 | 17,51,448.91 | 2,74,94,816.70 |
| 7 | 2,60,29,514.75 | 13,88,156.19 | 2,74,17,670.94 |
| | | | **19,25,08,479.98** |

म्हणजेच एकुण रु. 19.25 कोटी इतकी रक्कम येणाऱ्या 7 वर्षात द्यावयाची आहे. सदर रक्कम वार्षिक रु.2.74 कोटी व मासिक रु.22.88 लक्ष दरम्यानच्या काळात सदर रक्कम देयका पोटी संबंधीत संस्थेमार्फत स्ट्रीट लाईट पोल वरील एल.ई.डी. फिटींग पुर्णत: दोषदायीत्व कालावधीमध्ये मोफत बदलण्यात येणार आहेत. त्याकामी कोणत्याही प्रकारचे रक्कम अदा करण्यात येणार नाही. सदरचे दिवे बदल्यानंतर अंदाजे मासिक विज देयकामध्ये 50% बचत (म्हणजेच रु.22.50 लक्ष मासिक वीजबिलात) होणार आहे. उर्वरीत स्ट्रीट लाईट पोल, केबल्स यांची देखभाल व दुरुस्ती महानगरपालिकेस करावयाची आहे.

वरील दोन्ही संस्थाचे प्रस्ताव पाहता खालीलप्रमाणे वस्तूस्थिती दिसून येते.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | एल.ई.डी. दिव्यांवर होणारा खर्च | महानगरपालिकेस द्यावी लागणारी रक्कम | | वीज वापर बिलास होणारी बचत सरासरी रु.55.00 लक्ष (मासिक) | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वार्षिक | मासिक | | |
| 1 | मे. रिलायन्स एनर्जी लि. | रु.10.50 कोटी | रु.4.08 कोटी (मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर वाढ) | रु.34.03 कोटी | 40% (रु.22.00 लक्ष) | बचतीपेक्षा मासिक रु.12.00 लक्ष जास्त रक्कम द्यावी लागेल |
| 2 | मे. ई.ई.एस.एल. | रु.8.91 कोटी | सुमारे रु.2.74 कोटी 7 वर्षापर्यंत (रु.19.25 कोटी) | रु.22.83 लक्ष | 50% (रु.25.00 लक्ष) | बचत मधूनच मासिक 22.83 लक्ष रक्कम द्यावयाची आहे तसेच मे. रिलायन्स एनर्जीच्या देखभाल व दुरूस्ती बिलात रु.5.57 लक्ष रक्कम वाचणार आहे. |

मे. ई.ई.एस.एल. मार्फत फक्त एल.ई.डी. फिटींग बदलण्यात येणार असून देखभाल व दुरूस्ती देखील सदर एल.ई.डी. फिटींगची करण्यात येणार आहे. उर्वरीत स्ट्रीट लाईट पोल केबल्स इ. मे. रिलायन्स एनर्जी लि. मार्फत देखभाल व दुरूस्ती करण्यात येणार आहे. त्यांच्याकडून त्याचे वर नमूद केल्याप्रमाणे दराने बिल द्यावयाचे आहे. वीजपूरवठा देखिल मे. रिलायन्स एनर्जी लि. मार्फत सुरू राहणार आहे.

वरील वस्तूस्थिती पाहता एल.ई.डी. फिटींग मे. ई.ई.एस.एल. मार्फत बदलून घेणे आर्थिक फायद्याचे होणार असून इतर पथदीवे व केबल इ. मे. रिलायन्स एनर्जी लि. मार्फतच सुरू राहील. तरी सुध्दा सध्याचे वीजबिल व देखभाल दुरूस्तीचे बील यामध्ये मासिक सुमारे रु.5.00 लक्ष पर्यंत रकमेचा फायदा होणार असून महानगरपालिकेस नव्याने

कोणतीही जादा रक्कम द्यावी लागणार नाही. यापुढे मे. रिलायन्स एनर्जी लि. मार्फत नव्याने बसविण्यात येणाऱ्या पथदीव्यांवर सुध्दा मे. ई.ई.एस.एल. कडून एल.ई.डी. दिवे बसवून घेणे फायद्याचे राहणार आहे.

राज्य शासनाच्या धोरणानूसार मे. ई.ई.एस.एल. या सार्वजनिक उपक्रमासोबत करारनामा करून त्यांना कामे सोपविणेसाठी मा. महासभेची मान्यता देण्यास शिफारस आहे.

9/8/18

**(बालाजी खतगांवकर)**
**आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-3/DK/2018-19/MG-5

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

**मा. महासभा दि.** ०४/०८/२०१८

// गोषवारा //

**प्रकरण क्र. ( ६८ )** :- भाईंदर (पुर्व) जैसलपार्क चौपाटी देखभाल व दुरुस्ती कामांबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेत भाईंदर (पुर्व) येथे मौजे नवघर सर्व्हे क्र.15 मधील जागा आरक्षण क्र.122 अ "भाईंदर चौपाटी" साठी आरक्षित आहे. मा. जिल्हाधिकारी ठाणे यांनी सदर जागेपैकी 14.00 हेक्टर क्षेत्र विकसित करण्यासाठी विनामुल्य दि.1 मार्च 2018 रोजीच्या आदेशान्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे सोपविलेले आहे. सदर जागेवर तत्कालिन नगरपरिषद असल्यापासुन विविध धर्मियांकडुन साजरे केले जाणाऱ्या उत्सवा दरम्यान मुर्तीचे विसर्जन करण्यात येते. सदर जागा ही सागरी नियंत्रण क्षेत्र (CRZ) ने बाधित होत आहे. सदर जागेत मोठया प्रमाणावर नागरीक / रहीवाशी फिरावयास येत असुन महानगरपालिकेमार्फत सक्षम प्राधिकरणाच्या मान्यता घेऊन विविध सुविधा तसेच सोयी सुरक्षेच्या दृष्टीने तात्पुरत्या स्वरुपात करण्यात आलेल्या आहेत. सदर जागेवरील सोयी सुविधांची दैनंदिन देखभाल, वृक्षप्राधिकरण, आरोग्य, बांधकाम, आस्थापना या विभागामार्फत व सुरक्षेवर मोठया स्वरुपात खर्च होत असतो. त्यापुढे सदर जागा जाहिरातीच्या मोबदल्यात खाजगी संस्थाना देखभाल व दुरुस्ती साठी दिल्यास महानगरपालिकेचा देखभालीवर होणारा खर्च वाचु शकेल. सदर प्रस्तावाबाबत धोरणात्मक निर्णय झाल्यास सदर जागा निविदा मागवुन सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने खाजगी संस्थाना करारनामा करुन हस्तांतरीत करता येईल. तरी सदर प्रस्तावाबाबत धोरणात्मक निर्णय होणेस शिफारस आहे.

**आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.०४/०९/२०१८

## बांधकाम विभाग

## // गोषवारा //

प्रकरण क्रमांक ( ६९ ) :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ओल्या कचऱ्यावर विकेंद्रीकारण पध्दतीने उपलब्ध असलेल्या तंत्रज्ञानानुसार विल्हेवाट लावण्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थीतीत उत्तन येथे घनकचरा प्रकल्पाचे काम सुरु असून शहरातील सर्व कचरा उत्तन येथील जागेत टाकण्यात येत आहे. उत्तन येथील घनकचरा प्रकल्प स्थलांतरणा बाबतची प्रक्रीया सुरु असून सदर कामास गती येत नसल्याने व उत्तन डोंगरी भागातील रहीवाशांना सदर कचऱ्यामुळे त्रास होत असल्याने जन आकोश संघर्ष समितीने पत्र व्यवहार व प्रत्यक्ष भेटी घेऊन सदर कचरा उत्तन येथे टाकण्यास तिव्र विरोध केलेला आहे. या बाबत मा.महापौर, पदाधिकारी व जन आक्रोश संघर्ष समिती सदस्य व पदाधिकाऱ्या समवेत बैठक घेऊन शहरात ठिकठिकाणी ओला कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी विक्रेंद्रीकरण पध्दतीने प्रकल्प उभारण्याबाबत चर्चा करण्यात आली. सद्यस्थितीत ओला कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी उपलब्ध असलेल्या तंत्रज्ञानानुसार कंपोस्टींग, बायो मिथिनायजेशन, वर्मी कंम्पोस्टींग यापैकी एक पर्याय निवडून शहरात विविध भागात प्रकल्प उभारावयाचे आहेत. या करीता पहाणी करुन खालील ठिकाणे निश्चित करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | जागेचा तपशिल | ठिकाण |
|---|---|---|
| 1 | आरक्षण क्र.50 (खेळाचे मैदान) | मौजे राई |
| 2 | आरक्षण क्र.51 (ट्रेन्चिंग ग्राऊंड) | मौजे राई मुर्धा |
| 3 | आरक्षण क्र.135 (बगीचा) | मौजे भाईंदर |
| 4 | आरक्षण क्र.219 (माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान) | मौजे नवघर |
| 5 | आरक्षण क्र.248 (बगीचा) | मौजे नवघर |
| 6 | आरक्षण क्र.269 (बगीचा) | मौजे नवघर |
| 7 | आरक्षण क्र.271, 272 व 273 (डीस्पेंसरी, लायब्ररी, बगीचा) | मौजे नवघर |
| 8 | नागरी सुविधा क्षेत्र | मौजे मिरा सि.स.क्र.1442 ते 1446 व इतर मिरा, सि.स.क्र.1723 ते 1726 व इतर काशिमीरा सिरॅमिक्स तन्वी डेव्हलपर्स, काशिमीरा पोलिस स्टेशन मागे |
| 9 | आरक्षण क्र.368 (बगीचा) | मौजे महाजनवाडी सर्व्हे क्र.11 पै नविन महा विष्णू मंदिरामागे (संघवी इकोसिटी प्रकल्प जवळ) |
| 10 | आरक्षण क्र.353(A) (दफनभूमी व स्मशानभूमी) | मौजे पेणकरपाडा |

उपरोक्त 10 ठिकाणा व्यतिरिक्त महानगरपालिकेकडे सुविधा क्षेत्र भुखंड उपलब्ध असून सदर जागेत देखिल लहान प्रकल्प उभारता येणे शक्य आहे. वरील ठिकाणी ओल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रकल्प उभारण्यास उत्तन येथे फक्त सुका कचरा टाकता येईल यासाठी उपलब्ध असलेल्या तंत्रज्ञानानुसार निविदा मागवून कामे करुन घ्यावयाची आहेत. त्याचप्रमाणे 20,000 चौ.मीटर पेक्षा जास्त बांधकाम परवानगी दिलेल्या विकासकांना त्यांच्या गृहनिर्माण संकुलनात प्रकल्प तयार करुन कचऱ्याची शास्त्रोवत पध्दतीने विल्हेवाट लावावयाची आहे. त्याचप्रमाणे उत्तन येथे सद्यस्थितीती असलेल्या कचऱ्यातील निघणाऱ्या लिचेड वर प्रक्रिया करण्याची कार्यवाही देखिल करावयाची आहे.

वरील प्रमाणे आवश्यक कार्यवाही करण्या धोरण निश्चित करुन, सदर कामासाठी अर्थ संकल्पात आवश्यक तरतुद करण्यास व खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

18/7/18

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा-भाईदर महानगरपालिका

PC—09/VP/2018-19/YJ/Ghan Chra/MG-1

गोषवारा प्राप्त दि. 20 /07 /2018 वेळ 12.00
मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. 25
20/07/2018
लिपिक
नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०४/०९/२०१८

## // गोषवारा //

प्रकरण क्र. ५४ :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम २०(३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या आठ (८) सदस्यांच्या जागी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम २०(५) अन्वये नविन आठ (८) सदस्यांची नेमणूक करणे. तसेच स्थायी समितीच्या सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागी प्रकरण २ कलम २३ अन्वये सदस्यांची नेमणूक करणे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २०(३) अन्वये स्थायी समिती सदस्यांपैकी निम्मे (आठ) सदस्य माहे ऑक्टोबर २०१८ च्या पहिल्या तारखेस निवृत्त होत आहेत. करिता दि. २४/०८/२०१८ रोजीच्या स्थायी समितीमध्ये निम्मे आठ सदस्यांची नावे चिठ्ठी काढून निश्चित करण्यात आलेली आहेत. तसेच उर्वरीत आठ सदस्यांपैकी तीन सदस्यांनी आपल्या स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिलेला आहे.

निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नावे :-

१) श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील - भारतीय जनता पार्टी
२) श्री. हसमुख मोहनलाल गेहलोत - भारतीय जनता पार्टी
३) श्री. अशोक सुर्यदेव तिवारी - भारतीय जनता पार्टी
४) श्री. अनिल रावजीभाई विराणी - भारतीय जनता पार्टी
५) श्रीम. मेघना दिपक रावल - भारतीय जनता पार्टी
६) श्रीम. अनिता जयवंत पाटील - शिवसेना
७) श्रीम. दिप्ती शेखर भट - शिवसेना
८) श्रीम. वंदना विकास पाटील - शिवसेना

राजीनामा दिलेल्या सदस्यांची नावे :-

१) श्री. सुरेश जगदिश खंडेलवाल - भारतीय जनता पार्टी
२) श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी - भारतीय जनता पार्टी
३) **श्रीम. सय्यद नुरजाहाँ नाझर हुसेन - काँग्रेस लोकशाही आघाडी**

निवृत्त होणाऱ्या सदस्यांमध्ये भारतीय जनता पार्टीचे ५ व शिवसेना पक्षाचे ३ सदस्य निवृत्त होत आहेत. तसेच भारतीय जनता पार्टी २ व काँग्रेस लोकशाही आघाडीच्या १ सदस्याने स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिलेला आहे. मा. उपसचिव नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. संकिर्ण२००८/४३४/प्र.क्र.१५१/२००८/नवि-२५, दि. २० ऑक्टोबर २००८ अन्वये निवृत्त होणाऱ्या आठ व राजीनामा दिलेल्या दोन सदस्यांच्या जागी त्याच मान्यता प्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे किंवा फ्रंटचे नवीन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्यारुत आहे.

निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २०(५) अन्वये नविन आठ सदस्यांची दोन वर्षासाठी नेमणूक होणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २३ अन्वये राजीनामा दिलेल्या तीन सदस्यांच्या जागी उर्वरीत कालावधीसाठी नेमणूक होणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त 27/8/18
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०४/०९/२०१८

## // गोषवारा //

प्रकरण क्र. ५५ :- महिला व बालकल्याण समितीवर सदस्यांची नेमणूक करणेबाबत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३०(१) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करणे आवश्यक असुन, महानगरपालिकेतील गटाच्या तौलनिक संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची तरतुद आहे. माता व बालकांच्या विविध कल्याणकारी योजना शासकिय धोरणाप्रमाणे राबविणे तसेच यासंबंधी नविन योजना सादर करून शासकिय धोरणाप्रमाणे कार्यन्वित करणे हे या समितीचे कार्यक्षेत्र राहिल.

महानगरपालिका सभा कामकाज नियमचे कलम ४ (ब) अंतर्गत महिला व बालकल्याण समिती सदस्य संख्या नऊ इतकी निश्चीत आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३०(१) अन्वये महानगरपालिकेस, वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून (महिला व बालकल्याण समितीसह) विशेष समित्यांची नेमणूक करता येईल अशी तरतुद आहे. परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात विशेष समित्यांकरिता सदस्य संख्या नमुद नाही. मा. महासभा दि. १६/१०/२०१७, ठराव क्र. ०२ अन्वये महिला व बालकल्याण समिती सदस्यांची संख्या १५ इतकी निश्चित करुन ०१ वर्षाकरीता समिती गठित करण्यात आली होती.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून पक्ष/गट मिळून केलेल्या आघाडीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| भारतीय जनता पार्टी | शिवसेना | कॉंग्रेस लोकशाही आघाडी |
|---|---|---|
| ६१ | २२ | १२ (१० + २) |

तौलनिक संख्याबळाचे प्रमाणात महिला व बालकल्याण समितीवर सदस्यांचे नामनिर्देशन (उदाहरणार्थ) खालीलप्रमाणे होत आहे.

| अ. क्र. | पक्ष/गट/आघाडी | समिती सदस्य ९ प्रमाणे | प्रस्तावीत सदस्य | मागील गठीत समिती सदस्य संख्या १५ प्रमाणे | प्रस्तावीत सदस्य |
|---|---|---|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | ६१ ÷ ९५ x ९ = ५.७७ | ६ | ६१ ÷ ९५ x १५ = ९.६३ | १० |
| २ | शिवसेना | २२ ÷ ९५ x ९ = २.०८ | २ | २२ ÷ ९५ x १५ = ३.४७ | ३ |
| ३ | कॉंग्रेस लोकशाही आघाडी | १२ ÷ ९५ x ९ = १.१३ | १ | १२ ÷ ९५ x १५ = १.८९ | २ |

तरी महिला व बालकल्याण समितीची मुदत व सदस्य संख्या निश्चीत करुन, महिला व बालकल्याण समिती गठित करणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
27/8/18

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. ०४/०९/२०१८

## // गोषवारा //

प्रकरण क्र. ५६ :- महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ चे कलम ३(१) अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीवर सदस्यांची नेमणूक करणेबाबत.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरणाने त्या प्राधिकरणास ठरविता येईल अशारितीने आणि मुदतीसाठी नेमण्यात आलेल्या अध्यक्ष व इतर यासह कमीत कमी ५ आणि जास्त १५ व्यक्तींची मिळून बनलेल्या एका वृक्षप्राधिकरणाची रचना करता येईल अशी तरतुद आहे. सार्वत्रिक निवडणूक २०१२ नंतर महानगरपालिकेने वृक्ष प्राधिकरण समिती सदस्य संख्या १५ इतकी निश्चीत करुन वृक्ष प्राधिकरण समितीची रचना केली होती.

प्रकरण २ चा नियम ३(३) अन्वये वृक्षप्राधिकरणेस ज्यांना वृक्षाचे रोपण आणि जतन या क्षेत्रामध्ये विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींना वृक्षप्राधिकरणाचे सदस्य म्हणून नामनिर्देशित करुन घेता येईल. हे सदस्य वृक्षप्राधिकरण समिती ठरविल अशारितीने व मुदतीसाठी स्विकृत करण्यात आले पाहिजे. प्रकरण २ कलम ३ (२) नुसार वृक्ष प्राधिकरणाचा अध्यक्ष महानगरपालिका आयुक्त असतील.

ठाणे महानगरपालिकेने गठित केलेल्या वृक्ष प्राधिकरण समितीवर प्रकरण २ चा नियम ३(३) अन्वये ज्यांना वृक्षाचे रोपण आणि जतन या क्षेत्रामध्ये विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींना वृक्षप्राधिकरणाचे सदस्य म्हणून नामनिर्देशित न केल्याने मा. उच्च न्यायालय जनहित याचिका क्र.११९/२०१७ नुसार ठाणे महानगरपालिका वृक्ष प्राधिकरण समिती बरखास्त करण्यात आलेली आहे. करिता मा. उच्च न्यायालय जनहित याचिका क्र.११९/२०१७ मध्ये पारित आदेशाच्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्ष प्राधिकरण समिती गठित करताना प्रकरण २ चा नियम ३(३) अन्वये सदस्यांचे नामनिर्देशन होणे आवश्यक आहे. तथापी नियम ३(३) अन्वये नामनिर्देशित सदस्यांची संख्या पोटकलम १ अन्वये नियुक्त केलेल्या सदस्यांच्या संख्येपेक्षा अधिक असणार नाही.

तरी वृक्ष प्राधिकरण समितीची मुदत व महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये महापालिका सदस्यांमधून घ्यावयाची सदस्य संख्या व ३(३) अन्वये ज्यांना वृक्षाचे रोपण आणि जतन या क्षेत्रामध्ये विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींमधून घ्यावयाची सदस्य संख्या निश्चीत करुन, वृक्ष प्राधिकरण समितीची रचना करणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि.०४/०९/२०१८

### महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' मधील प्रकरण दोन (के) अन्वये प्रस्ताव

### //गोषवारा //

**प्रकरण क्र. :- बोर्ड/बॅनर इ. जाहिरातींमुळे शहराचे होणारे विद्रुपीकरण थांबविणेबाबत.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दितील अनधिकृत पणे उभारण्यांत येणाऱ्या जाहिराती/ बॅनर/ होर्डिग /पोस्टर्स/डीजीटल फ्लॅक्स /तात्पुरत्या आर्चेस(कमानी) इ.द्वारे प्रसिध्द होणाऱ्या जाहिरात विरुध्द संबंधित प्राधिकरण प्रभावीपण कारवाई करीत नसल्याने मा.उच्च न्यायालय मुंबई येथे जनहीत जाचिका १५५/२०११ दाखल करण्यांत आली. सदर याचीकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.०६/०८/२०१४ रोजी पारीत केलेल्या निर्णयानुसार अनधिकृत जाहिरातींवर प्रभावीपणे कारवाई करणेकरीता सविस्तर आदेश पारीत केलेला आहे. व प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती कार्यालय क्र. १ ते ६ यांना नोडल ऑफिसर म्हणुन नियुक्त करण्यांत आले होते व त्यांना खालीलप्रमाणे कामाचे स्वरुप देण्यांत आले होते.

१) शुभेच्छांचे तात्पुरत्या स्वरुपाचे जाहिराती/ बॅनर/ होर्डिग /पोस्टर्स/डीजीटल फ्लॅक्स /कटआऊट/तात्पुरत्या आर्चेस(कमानी) इ. यांचे आकारमान ६ X ४ कमाल चौ.फुटापर्यंत असणे बंधनकारक करावे तसेच एकाच वेळी एकाच अर्जदारास एका जाहिरातीकरीता फक्त ५ बॅनरची परवानगी देण्यांत यावी.

२) तात्पुरत्या स्वरुपाचे जाहिराती/ बॅनर/ होर्डिग /पोस्टर्स/डीजीटल फ्लॅक्स /कटआऊट/तात्पुरत्या आर्चेस(कमानी) इ. करीता परवानगी फक्त ५ दिवसांकरीता देण्यांत यावी.

३) तात्पुरत्या स्वरुपाचे जाहिराती/ बॅनर/ होर्डिग /पोस्टर्स/डीजीटल फ्लॅक्स /कटआऊट/तात्पुरत्या आर्चेस(कमानी) इ. करीता परवानगी देते वेळी अर्जदाराकडून जाहिरात फी करीता होणाऱ्या शुल्काच्या १० पट अनामत रक्कम महानगरपालिकेकडे जमा करावी व मुदतीत जाहिरातीचे फलक न काढल्यास अनामत रक्कम जप्त करावी. तसेच अनामत रक्कमेकरीता संबंधितांनी सर्व फलक स्वत: काढून टाकलेबाबतचे छायाचित्रासह अर्ज करणे बंधनकारक करावे तद्नंतर अनामत रक्कम अदा करण्यांत यावी.

४) जाहिरात फलकावर मुद्रक, प्रकाशक यांचे नाव, जावक क्र. व परवानगीचा कालावधी नमुद करणे बंधनकारक करावे ज्या फलकांवर असे नमुद नसल्यास सदरचे फलक त्वरीत काढण्यांत यावेत व संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यांत यावेत.

परंतु दि.०१/०३/२०१८ रोजीच्या आदेशानुसार उपआयुक्त (जाहिरात) यांना नोडल ऑफिसर म्हणुन नियुक्त करण्यांत आले आहे. त्याअनुषंगाने सर्व प्रभाग अधिकाऱ्यांमार्फत निश्चित केलेल्या त्यांच्या कार्यक्षेत्रात अनधिकृतपणे उभारलेल्या जाहिराती/ बॅनर/ होर्डिग /पोस्टर्स/डीजीटल

फ्लॅक्स /तात्पुरत्या आर्चेस(कमानी) इ.वर नियमीत कारवाई करण्यांत येते. त्यावर उपआयुक्त (जाहिरात) यांचे नियंत्रण आहे.

यासर्व बाबी करीत असताना महानगरपालिका क्षेत्रात विविध राजकीय पक्ष, राजकीय कार्यकर्ते, शैक्षणीक संस्था व वैयक्तीक स्वरुपात विविध ठिकाणी छोट्या मोठया प्रमाणात बोर्ड बॅनर उभारले जातात त्यापैकी परवानगी घेतलेल्या असल्या तरी परवानगी नंतरही जाहिरात प्रसिध्द होत असते. यावर प्रभाग कार्यालयामार्फत नियमीत कारवाई करण्यांत येते परंतु अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने बऱ्याच ठिकाणी छोट्या मोठया जाहिराती काढण्याचे राहून जाते त्यामुळे शहराचे विद्रुपीकरण होत असते. यासर्व बाबींचा विचार करता यापूढे कोणत्याही प्रकारची पोर्स्टस/बॅनर इ. प्रसिध्द करण्यास मज्जाव केल्यास यासर्व विद्रुपीकरणास चाप बसु शकेल.

ज्याठिकाणी महानगरपालिकेने २३६ होर्डिंग उभारण्यास परवानगी देण्यांत आली होती. त्यापैकी १३८ होर्डिंगचा ठेका कालावधी चालु आहे. उर्वरीत ९८ होर्डिंगचा ठेक्याचा कालावधी संपला असुन निविदा प्रक्रीया प्रस्तावित आहे अशा एकुण २३६ होर्डिंग महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर आहेत तसेच बी.ओ.टी. तत्वावर २१ कॅन्टीलीवर यांची उभारणी केली असुन करारनाम्यानुसार संबंधितांना १५ वर्षांकरीता असुन प्रत्येक वर्षी परवानगी देण्यांत येते. तसेच मे.जी.सी.सी. क्लब यांनी ४ होर्डिंग उभारलेल्या आहेत. (अशा एकुण महानगरपालिकेच्या जागेवर २६१ होर्डिंग आहेत) या व्यतीरीक्त शहरात खाजगी जागांवर ८२ होर्डिंग उभारणेस परवानगी देण्यांत आलेली आहे. (एकुण एकत्रीत ३४३ ठिकाण)

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात फक्त अधिकृत होर्डिंगवर जाहिरात होणे आवश्यक असुन त्यासाठी सार्वजनिक जागांवर होर्डिग व रस्त्याच्या दुभाजकांच्या ठिकाणी कॅन्टीलीवर महानगरपालिकेमार्फत उभारल्यास महानगरपालिकेस मोठया प्रमाणावर कायमस्वरुपी उत्पन्न मिळु शकेल. सदर होर्डिग या टप्प्याटप्प्याने महानगरपालिकेमार्फत शासन अनुदानातुन व महानगरपालिका निधितुन बांधता येतील. महानगरपालिकेच्या स्वत:च्या होर्डिंग बांधेपर्यंत कंत्राट पध्दतीने दिलेल्या होर्डिंगवरील जाहिराती सुरु ठेवण्यांत येतील व तद्नंतर टप्प्याटप्प्याने महानगरपालिकेच्या होर्डिंग/कॅन्टीलीवर तयार करुन सदर कंत्राट रद्द करण्यांत येईल. यासाठी आवश्यक निधी वेळोवेळी उपलब्ध करुन देता येईल.


संपूर्ण शहरात विविध प्रकारचे तसेच विविध आकारमानाचे जाहिराती अस्ताव्यस्तपणे खांबावर झाडांवर व इतरस्त्र लटकवलेल्या स्थितीत असतात त्यामुळे शहर विद्रुप दिसत असल्याने त्यावर कारवाई करताना अपुऱ्या मनुष्यबळामुळे विलंब होतो. त्यामुळे यापूढे अधिकृत होर्डिंग व्यतीरीक्त कोणत्याही ठिकाणी जाहिरातीसाठी परवानगी न देणे अनधिकृत फलक जाहिरातीं करणाऱ्यांवर कायदेशिर कारवाई करणे तसेच महानगरपालिकेमार्फत सर्व ठिकाणी होर्डिंग उभारणेबाबत धोरणात्मक निर्णय होणेस शिफारस आहे.

गोषवारा प्राप्त दि.३०|०८|२०१८ वेळ.०४:४५.वा.
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर अ. क्र ...... ८८ ...... वर्ष :- २०१८-१९

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका
30/8/18

लिपिक ३०|०८|२०१८
नगररचना विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रकरण क्र.६५ करिता मा. महासभा दि. ०४/०९/२०१८




LEGEND :-

EXISTING ROAD -

D.P. ROAD -

PROPOSED ROAD -

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर

सहाय्यक संचालक नगररचना
मिरा - भाईंदर महानगरपालिका

DRG TITLE.
PLAN SHOWING THE PLANE TABLE MEASURMENT OF SURVEY NO- HISSA NO- AT.VILL- DONGRI POST- UTTAN TAH & DIST. THANE.

AREA STATEMENT

| SURVEY NO | HISSA NO | C.T.S NO | SQ METERS | SQ YARDS | SQ FEET |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

LEGEND :-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Survey no line | shown thus | | | |
| FIXED STONE | -"- | -"- | ⊗F | ⊗F |
| Forest Buruj | -"- | -"- | | |
| Gutter | -"- | -"- | | |
| Electric/Light Te.ph.pole | -"- | -"- | | |
| COCONUT TREE | -"- | -"- | | |
| TREES | -"- | -"- | | |
| EXISTING BUND | -"- | -"- | | |
| ROAD | -"- | -"- | ROAD | |
| FENCING | -"- | -"- | | |
| STRUCTURE'S | -"- | -"- | | |
| WELL | -"- | -"- | W | |
| BOREWELL | | | BOREWELL | |
| C.Wall | | | | |
| Culvert | | | | |

SURVEYED BY-SANDIP INGLE
DRAWN BY -PRITI R. MHATRE
DRG NO : 104/2017
DATE : 27/12/2017

N

SCALE-1:2000

M.B.RANE
(Surveyor)
15 GROUND FLOOR,
SAHAKAR JYOT
BELOW T D C BANK
C S M MARG
BHAYANDER WEST
THANE 401 101
PHONE 2819....